# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

०९ जुलै,२०२०


☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

: 7447744100 (PRO)


## स्थानिक गुन्हे शाखेची अवैध दारू तस्करांविरूध्द कार्यवाही

### २ गुन्हयात ०६ लक्ष ४० हजाराचा मुद्देमाल हस्तगत

दिनांक ०८/०७/२०२० रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मा. पोलीस अधीक्षक डॉ.श्री. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात अवैध दारूतस्करांविरूध्द कार्यवाही करीत रू. चा मुददेमाल हस्तगत केला आहे.

दिनांक ०८/०७/२०२० रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मिळालेल्या गोपनीय माहितीवरून रात्रोगस्त दरम्यान दोन मोपेड वाहनास ताब्यात घेवुन झडती घेतली असता, ३ आरोपीतांच्या ताब्यात १००० नग देशी दारू चा माल मिळुन आला. सदर दारूचा माल आणि दोन मोपेड वाहन एकुण किं. **२,४०,०००/—रू** चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन रामनगर येथे अप.क्र. ६३०/२०२० अन्वये नोंद करण्यात आला असुन पुढिल तपास सुरू आहे.

तसेच रामनगर पोलीस स्टेशन परिसरात मिळालेल्या गोपनीय माहितीवरून एका चारचाकी वाहनास ताब्यात घेवुन वाहनाची झडती घेतली असता, वाहनामध्ये अवैध रित्या २००० नग देशी दारूचा माल मिळुन आला. सदर दारूचा माल आणि वाहन असा एकुण **४,००,०००/—रू** चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन रामनगर येथे अप.क्र. ६३१/२०२० अन्वये नोंद करण्यात आला असुन पुढिल तपास सुरू आहे.

सदरचा गुन्हयाचा तपास पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरिक्षक श्री. ओ.जी. कोकाटे यांचे नेतृत्वात पोउपनि. सचिन गदादे, सफौ. भोयर, पोहवा. केमेकर, खनके, पोना. बल्की, अमजद, मिलींद, जमीर, पोना. अनुप, पोशि. जावेद, प्रफुल, नितीन यांनी पार पाडली.

———————————————————————————————————

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

०९ जुलै,२०२०

☎ : 07172-264300

: 07172-255800

: 7447744100 (PRO)


# घरफोडीच्या गुन्हयातील आरोपी रामनगर पोलीसांकडुन जेरबंद

## ३ गुन्हयात ८१ हजाराचा मुद्देमाल हस्तगत

दिनांक ०८/०७/२०२० रोजी पोलीस स्टेशन रामनगर येथील गुन्हे शोध पथकाने मिळालेल्या गोपनीय माहितीवरून दोन वेगवेगळया घटनांमध्ये तिन आरोपीतांना अटक करून त्यांचे कडुन रामनगर पोलीस ठाणे कडील तिन चोरीच्या गुन्हयांची उकल करण्यात यश आले आहे.

रामनगर पोलीस स्टेशन कडील अप.क्र. ५९२/२०२० भादंवि ३७९ दाखल गुन्हयात आरोपी नामे अमोल आदेश ईलमकर वय १९ रा. समता नगर चंद्रपुर यांचे कडुन गुन्हयातील ओपो कंपनीचा आणि रियलमी कंपनीचा मोबाईल फोन एकुण किं. ३५,०००/—रू चा मुद्देमाल हतस्तगत करण्यात आलेला आहे. तसेच ५९९/२०२० भादंवि ३८०, ३४ व ६२७/२०२० भादंवि ४५७,३८०,३४ या गुन्हयात आरोपी १) गोपाल जिवन मालाकार वय २४ रा. श्याम नगर चंद्रपुर, २)प्रशांतो अतुल हलदार वय २५ रा. श्याम नगर चंद्रपुर यांना वरील गुन्हयात अटक करण्यात आले असुन त्यांचे कडुन लावा, सॅमसंग, नोकीया, जिओ तसेच गुन्हयात वापरलेली मोटारसायकल असा एकुण ४८,१००/—रू, किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. अशा प्रंकारे रामनगर पोलीस ठाणे येथील गुन्हे शोध पथकाने तिन्ही गुन्हयात एकुण ८३,१००/—रू किं. चा मुद्देमाल तिन आरोपीतांकडुन जप्त केला आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेडड्ी यांचे मार्गदर्शनात रामनगर पोलीस ठाणे पोलीस निरिक्षक श्री. प्रकाश हाके यांचे नेतृत्वात पोउपनि. संदीप कापडे, पोहवा. रजनिकांत पुटट्ावार, मनोहर कामळी, नापोशि. पुरूषोत्तम चिकाटे, संजय चौधरी, पोशि. विकास जुमनाके, मपोशि. भावना रामटेके यांनी केली.

———————————————————————————————————